# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २३-३-२०१५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक २३ मार्च २०१५ (का.प.क्र .४०) मा.महापौर सौ. कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १०-४५ वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश पवार ,नगरसचिव श्री. एम.ए पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास

२. स.स. श्री. विजय लक्ष्मण वाघचौरे

३. स.स. श्री. किशोर बाबुराव नागरे

४. स.स.श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव

६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष

७. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास

८. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल

९. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव

१०. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर

११. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश

१२. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव

१३. स.स.श्री.चौधरी संजय सांडू

१४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

१५. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद

१६. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार

१७. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ

१८. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

१९. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली

२०. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान

२१. स.स.श्री.अफसरखान यासीन खान

२२. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

२३. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
२४. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
२५. स.स.डॉ. खान जफर अहेमद
२६. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
२७. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
२८. स.स.श्री. बबन पंडीतराव नरवडे
२९. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
३०. स.स.श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
३१. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
३२. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
३३. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
३४. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
३५. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
३६. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
३७. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
३८. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद

चर्चा :-

श्री.गिरजाराम हाळनोर :प्रख्यात लोककलावंत शाहीर साबळे यांचे दु:खद निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे श्रृध्दांजली देण्यात यावी.

श्री. गजानन बारवाल :स.सदस्या अनिता घोडिले यांच्या भगिनी कुंदा प्रविण नाईक यांचे निधन झालेले आहे. यांनाही श्रृध्दांजली अर्पण करावी.

श्री. किशोर नागरे :यास माझे अनुमोदन आहे तसेच स.सदस्य श्री.मालानी यांच्या भगिनी कमलादेवी मंत्री यांचे दु:खद निधन झाले आहे यांना श्रृध्दांजली अर्पण करावी.

या वेळी लोक कलावंत स्व. शाहीर साबळे स्व.कुंदा प्रविण नाईक तसेच स्व.कमलादेवी मंत्री यांचे दुख:द निधन झाल्याने त्यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.गिरजाराम हाळनोर : सभेसाठी कोरम नसल्याने ०५ मिनिटासाठी सभा तहकूब करावी.

मा.महापौर : कोरम नसल्याने ०५ मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ स.१०-४४ वा.पुन्हा १०-५५ वा.सभेला सुरूवात)

श्री.किशोर नागरे : सभागृहात पुन्हः कोरम नाही त्यामुळे सभा ०५ मिनिटासाठी पुन्हः तहकूब करावी.

मा.महापौर : सभा ०५ मिनिटासाठी पुन्हा तहकूब करण्यात येते.(वेळ स.१०-५५ वा.पुन्हा ११-०० वाजता सभेला सुरूवात)

श्री.किशोर नागरे :विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

**विषय क्रमांक ७८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी स्थायी समितीने मंजुरी दिल्यानुसार उपभोक्ता कराचे दर निश्चित करणे व त्यासाठी दिनांक २१.०२.२०१५ रोजी सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला ठराव क्र.७४६ चा फेरविचार करुन उपभोक्ता कराचे दर कमी करणे बाबत उचित निर्णय घेणे.

**सुचक:-** श्री.संजय सांडू चौधरी, श्री.रवि साहेबराव कावडे.

**अनुमोदक:-** श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे, श्रीमती प्रिती संतोषकुमार तोतला.

श्री.किशोर नागरे :- विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :-मागील सभेतील विषय क्रमांक-७४६ मध्ये जे उपभोक्ता कर लावण्यात आलेले होते. त्यात दुरूस्ती सुचविण्यात येते. निवासी वापरासाठी असलेल्या इमारतींना रु.१००/- उपभोक्ता कर लावण्यात यावे व निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी रु.५००/- उपभोक्ता कर आकारण्यात यावे.

श्री. त्रिंबक तुपे :-आताच स.सदस्य यांनी जी दुरूस्ती सुचविली त्यास सभागृहाचे अनुमोदन आहे. दुरूस्ती करून स्विकृतीसह मंजुर करावे.

मा.महापौर :-याबाबत निर्णय देण्यात येतो की, निवासी वापरासाठी रु.१००/- व निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी रु.५००/- उपभोक्ता कर आकारण्यात यावे. या दुरूस्तीसह हा विषय मंजुर करण्यात येतो. प्रशासनाने यावर ताबडतोब अंमलबजावणी करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी दिनांक २१.०२.२०१५ रोजी सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला ठराव क्र.७४६ नुसार उपभोक्ता कराचे निश्चित केलेल्या दरात दुरूस्ती करुन आता निवासी वापरासाठी रु.१००/- व निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी रु.५००/- उपभोक्ता कर आकारण्याास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

(महबुबखॉ पठाण)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद